आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज नौदलाच्या सुरत, नीलगिरी या नौकांचं आणि वाघशीर या पाणबुडीचं राष्ट्रार्पण; नवी मुंबईतील इस्कॉन मंदीराचही केल लोकार्पण.
2. दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आज छत्रपती संभाजी नगर इथ केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांच्या हस्ते होणार उद्घाटन.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय नागपूर येथे येत्या 17 ते 19 जानेवारी दरम्यान राष्ट्रीय विधी उत्सव 'जस्टा कॉझा'चे आयोजन.
4. उत्तम साहित्य समाजाला दिशा देणारे - आचार्य अविनाश आवलगांवकर यांचे विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन आणि वाङ्मय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिपादन.

------------------------------------

लढाऊ जहाजांचं जलावतरण/इस्कॉन मंदीर

भारत विस्तारवाद नाही, तर विकासवादाच्या दिशेने काम करतो आहे. भारताने खुल्या, सुरक्षित, समावेशक आणि समृद्ध हिंद प्रशांत क्षेत्राचं नेहमीच समर्थन केलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुंबईत नौदलाच्या गोदीत आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट केल्यानंतर ते बोलत होते. नौदलाच्या ताफ्यात एकाच वेळी एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी समाविष्ट होण्याची ही पहिलीच वेळ आहे. यामुळं भारताची सुरक्षा आणि प्रगतीला नवीन सामर्थ्य मिळेल असं ते म्हणाले.

*आज भारत की समुद्री विरासत नेवी के गौरवशाली इतिहास और आत्मनिर्भर भारत अभियान के लिए भी बहुत बड़ा दिन है। छत्रपति शिवाजी महाराज ने भारत में।नौसेना को नया सामर्थ्य दिया था, नया विजन दिया था आज उनकी इस पावन धरती पर इक्कीसवीं सदी की नेवी को सशक्त करने की तरफ हम एक बहुत बड़ा कदम उठा रहे हैं।*

आज भारत संपूर्ण जगात, विशेषतः ग्लोबल साऊथ क्षेत्रात एक विश्वासार्ह आणि जबाबदार मित्र देश म्हणून ओळखला जातो. आर्थिक प्रगती, ऊर्जा सुरक्षा यासाठी जलसुरक्षा आवश्यक असल्याचं प्रतिपादन त्यांनी केलं.गेल्या १० वर्षांत भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांनी आत्मनिर्भरतेचा मंत्र अवलंबला आहे, त्याचं त्यांनी कौतुक केलं. सर्वांच्या सहकार्यानं लवकरच संरक्षण क्षेत्राचा कायापालट होईल, असं त्यांनी सांगितलं. संकटकाळात इतर देशांवरचं भारताचं अवलंबित्व कमी करणं, रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करणं यामुळे शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या १० वर्षात नौदलाच्या ताफ्यात ३३ युद्धनौका आणि ७ पाणबुड्या सहभागी झाल्या आहे. यातल्या ३९ देशात बनवल्या होत्या याकडे त्यांनी लक्ष वेधलं.वाढवण बंदराला मंजुरी, सीमावर्ती भागांमध्ये वाढती जोडणी, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, इत्यादी कार्यक्रमांचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला.या कार्यक्रमानंतर पंतप्रधानांनी नवी मुंबईच्या खारघर येथे श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर, इस्कॉन प्रकल्पाचेही उद्घाटन केल. नऊ एकरांवर वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश असून मोदी यांनी या मंदिराचे महत्व सांगितल.

*नई पीढ़ी की रूचि और आकर्षण के अनुरूप यहाँ रामायण, महाभारत उसको समेटे हुए उस पर आधारित म्यूजियम भी बनाया जा रहा है। यहाँ वृंदावन के बारह जंगलों पर आधारित एक उद्यान भी विकसित किया गया है। मुझे विश्वास है यह मंदिर परिसर आस्था के साथ साथ भारत की चेतना को भी समृद्ध करने का एक पुण्य केंद्र बनेगा।*

प्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री,आणि उपमुख्यमंत्री प्रामुख्याने उपस्थित होते.

---

भारतीय लष्कर दिन

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा केला जात आहे. भारतीय लष्कराचं सैनिकांचं शौर्य, बांधिलकी आणि मातृभूमीची सेवा यांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. याच दिवशी १९४९ मध्ये तत्कालीन जनरल के. एम. करिअप्पा यांनी शेवटच्या ब्रिटीश कमांडर इन चीफकडून भारतीय सैन्याची सूत्रं हातात घेतली होती. या घटनेच्या स्मरणार्थ लष्कर दिन साजरा केला जातो.लष्कर दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लष्करातले जवान आणि ज्येष्ठ तसंच निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिक देशाच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी योगदान

देतात. आपल्या सीमेचं रक्षण करण्यासाठी ते सदैव सज्ज असतात, असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

-------------------------------------

अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा उद्घाटन सोहळा आज १५ जानेवारी बुधवार रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजी नगर येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख संपन्न होणार आहे. या उद्घाटन सोहळ्याच उद्घाटन केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांचे हस्ते होणार असून यावेळी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिध्द व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण मा. सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

-------------------------------------

पूजा खेडकर

निलंबित प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकरला सर्वोच्च न्यायालयानं अटकेपासून संरक्षण दिलं आहे. दिल्ली उच्च न्यायालयानं तिचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता. त्यावर तिनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर सर्वोच्च न्यायालयानं आज सुनावणी घेतली, आणि तिच्याविरुद्ध कठोर पावलं उचलू नयेत, असे आदेश दिले.

-------------------------------------

जस्टा कॉझा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाद्वारे येत्या 17 ते 19 जानेवारी दरम्यान 'जस्टा कॉझा' या राष्ट्रीय विधी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून 17 जानेवारी शुक्रवार रोजी सायंकाळी 5 वाजता लॉ कॉलेज अमरावती रोड स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या सभागृहात या उत्सवाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे यांच्या हस्ते होणार आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य आणि या महोत्सवाचे

मुख्य आयोजक डॉ. रवीशंकर मोर यांनी आज दिली . याप्रसंगी त्यांनी या विधी महाविद्यालयाचे महत्त्व तसेच राष्ट्रीय विधी महोत्सवाचे महत्त्व अधोरेखित केले

*यहाँ पर करीबन एक हजार विद्यार्थी शिक्षा लेते हैं और आप सभी जानते हैं कि इस महाविद्यालय से मुख्य न्यायाधीश से लेकर भारत के पंतप्रधान ऐसे अनेक मान्य वर्ग इस महाविद्यालय के विद्यार्थी रहे हैं तो जस्टा पर्व में हम विद्यार्थियों को किस प्रकार से ट्रेनिंग हो और किस प्रकार से उनका एक्सपोजर हो राष्ट्रीय विषयों पर अंतरराष्ट्रीय विषयों पर और उनका पार्ट ऑफ दी ट्रेनिंग ऍज अ लॉयर कैसा उचित ढंग से हो सके*

*इसलिए इस आयोजन का विशेष महत्व है।*

या तीन दिवसीय महोत्सवांमध्ये युवा परिषद- नागपूर डायलॉग या अंतर्गत दुस-या दिवशी 18 जानेवारी शनिवार रोजी गणमान्य व्यक्तींमत्वांच्या उपस्थितीमध्ये युवा संवाद कार्यक्रम होईल . विधानसभेचे अध्यक्ष डॉ. राहुल नार्वेकर यांच्या मुख्य उपस्थितीत नागपूर विधान भवनाच्या सभागृहात सकाळी 10 वाजता राष्ट्रीय युवा परिषद देखील होणार आहे. संध्याकाळी 4 वाजता जस्टा कॉझा अतिथी व्याख्यानाअंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती उज्जल भुयान हे व्याख्यान देतील.

------------------------------------

रस्ते सुरक्षा सप्ताह

रस्ते सुरक्षा सप्ताहा अंतर्गत अपघातावर आळा घालण्यासाठी गोंदिया उप प्रादेशिक परिवहन विभागा आणि शहर वाहतूक शाखेच्या वतीने आज गोंदिया शहरात हेल्मेट चा वापर करित बाईक रॅली काढण्यात आली यात नागरिकांनी देखील मोठ्या संख्येत भाग घेतला होता . वाहतूक नियमांचे पालन करूनच वाहने चालावा असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसरकर यांनी केल आहे.

*शहरभर रॅली फिरवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने जनजागृती करणे हाच उद्देश होता. वाहन चालविताना दुचाकी चालवताना स्पेशली हेल्मेटचा वापर करावा.त्याचबरोबर त्यावर स्लोगन लावलेले होते. त्यामध्ये वाहन चालवत असतील कार चालवताना सीटबेल्टचा वापर किंवा वाहनाची गती स्पीड लिमिट चा पालन करणे,किंवा वाहन चालवताना कोणी मोबाईलचा वापर करू नये असे विविध वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृतीसाठी आजची रॅली करण्यात आली.त्याचबरोबर माननीय जिल्हाधिकारी यांच्या हस्ते दिनांक 22 रोजी मोफत हेल्मेट वाटपदेखील आपण करणार आहोत.*

------------------------------------

विसा संघ

कोणतेही श्रेष्ठ साहित्य काळाच्या चौकटीत संपत नाही. पुढची अनेक वर्ष जे जे उत्तम साहित्य टिकून राहील ते समाजाच्या व्यवस्थेला दिशा देत राहणार आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू आचार्य अविनाश आवलगांवकर यांनी केले. विदर्भ साहित्य संघाचा 102 वा वर्धापन दिन समारंभ आणि वाङ्मय पुरस्कार सोहळा  मकर सक्रांतीच्या पर्वावर विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात आयोजित करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाकडे जून ते जुलै २०२३- २४ या काळात प्रकाशित झालेल्या साहित्यकृतींमधून विदर्भातील प्रसिद्ध लेखकांसह नवोदित लेखकांच्या पुस्तकांना तसेच, राज्यस्तरीय पुरस्कारांचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

-----------------------------------